जळगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि शिक्षणशास्त्र विभाग, आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० जनजागृती कार्यक्रम' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा ३० सप्टेंबर रोजी शिक्षणशास्त्र विभागाच्या चर्चासत्र सभागृहात आयोजित करण्यात आली.

यावेळी मंचावर आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेच्या संचालिका डॉ. मनीषा इंदाणी, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. मनीष जोशी, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. साहेबराव भूकन, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संतोष खिराडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विषयावरील भित्तीपत्रिकेचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रिकांचे सादरीकरणही करण्यात आले असून यात आशा पाटील, रवींद्र महाले, महेश पावरा, कमलेश पाटील, विनोद राठोड आणि आरती बिऱ्हाडे यांनी सहभाग घेतला.

डॉ. मनीषा इंदाणी यांनी प्रास्ताविकातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची उद्दिष्टे, संधी व आव्हाने समजून घेण्यासाठी विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जनजागृती आवश्यक असल्याचे सांगितले.

डॉ. मनीष जोशी यांनी भारतीय शिक्षणव्यवस्थेत होत असलेल्या बदलांवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, मातृभाषेतील शिक्षण, अनुभवाधारित व कृतीआधारित शिक्षण तसेच चिकित्सक विचार व सर्जनशीलतेच्या विकासावर भर दिला. बदलत्या परिस्थितीत शिक्षकाची भूमिका केवळ ज्ञान देणाऱ्याची न राहता मार्गदर्शक व सुलभकर्ता म्हणून विकसित होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पहिल्या सत्रात डॉ. साहेबराव भूकन यांनी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि माध्यमिक शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन केले. कौशल्याधारित शिक्षण, विद्यार्थ्यांचा बौद्धिक, भावनिक व सामाजिक विकास, शैक्षणिक व मानसशास्त्रीय समुपदेशन, तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि शिक्षक-विद्यार्थी मार्गदर्शक पद्धतीचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. तसेच संविधानिक मूल्ये, समता, बंधुता व सामाजिक जबाबदारी विद्यार्थ्यांच्या शिक्षणातून रुजविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

दुसऱ्या सत्रात भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील डॉ. सुनील कुलकर्णी यांनी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि उच्च शिक्षण प्रणाली' या विषयावर मार्गदर्शन केले. उच्च शिक्षण

अधिक बहुविषयक, लवचिक, कौशल्याभिमुख आणि विद्यार्थीकेंद्रित करण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली. संशोधन, नवोपक्रम, तंत्रज्ञानाचा वापर, रोजगारक्षमता आणि विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार व समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यावर त्यांनी भर दिला.

समारोपपूर्व सत्रात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी : संधी, आव्हाने व विद्यार्थ्यांची भूमिका' या विषयावर संवादात्मक सत्र झाले. डॉ. संतोष खिराडे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना मार्गदर्शनपर उत्तरे देत कौशल्यविकास, स्वयंअध्ययन, संशोधनवृत्ती, नवोपक्रम आणि आजीवन शिक्षणाची गरज अधोरेखित केली.

कार्यशाळेत ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन डॉ. रणजित पारधे यांनी केले. आयोजनासाठी डॉ. स्वाती तायडे, श्री. संदीप वाघ, श्री. जयेश पाटील, श्री. विवेक भावसार तसेच एम.एड. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

.............................................................................................................
....................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: 30 सप्टेंबर, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी
करीता